कार्यालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली.

क्रंमाक स.अ.(बांध.)/सीसीटीव्ही/३६२०/२०२६,दिनांक २४/०८/२०२६

दरपत्रक/निवीदा सुचना

याद्वारे कळविण्यांत येते की, जिल्हा न्यायालयीन इमारतीच्या बाहेरील जिल्हा विधी सेवा सदन, गडचिरोली या कार्यालयाकडे जाणा-या रस्त्याच्या बाजुचा ०१ कॅमेरा तसेच इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ उजव्या बाजूला पार्कींगकरीता असलेला ०१ कॅमेरा बंद स्थितीत आहे. असे एकूण ०२ कॅमेरे न्यायालयीन ईमारतीतील बंद असल्यामुळे पुरवठा करण्याबाबत ईच्छुक प्रतिष्ठानांनी सिलबंद निवीदा माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गडचिरोली यांच्या नावाने **दिनांक ०१/०९/२०२६** च्या सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे सादर करण्यांत यावे. तसेच लिफाफ्यावर **''सी.सी.टि.व्ही कॅमेरा खरेदी बाबतची निविदा''** असे नमुद करावे.

अ.क्रं.	विवरण Specification	मागणी संख्या
1	CP Plus Bullet Camera	2

अटी व शर्ती :- १. वरील विवरणामध्ये नमुद केल्याप्रमाणे सी.सी.टि.व्ही कॅमेरा चे दर हे सर्व करासहीत असले पाहीजे.

२. सी.सी.टि.व्ही कॅमेरा चा हमी कालावधी (Guaranty) निवीदामध्ये नमुद करणे अनिवार्य राहील.

३. सदरहू सी.सी.टि.व्ही कॅमेरा चा पुरवठा केल्यानंतर काही बिघाड निर्माण झाल्यास किंवा व्यवस्थित कार्य करीत नसल्यास, तक्रार केल्यापासुन दहा दिवसांचे आत नवीन लावुन देणे आवश्यक राहील.

४. कोणत्याही प्रकारचे आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाही

५. सदरहू नमूद साहित्याच्या पुरवठा जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे करणे अनिवार्य असुन त्याकरीता वेगळा खर्च मिळणार नाही. सीसीटीव्ही कॅमेरा स्थापीत करण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

६. निवीदा कोणत्याही कारणास्तव रद्द करणे किंवा मागणी संख्येत वाढ किंवा घट करणे याबाबतचा पुर्ण अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गडचिरोली यांना राहील.

७. दरपत्रकामध्ये जि.एस.टी. क्रमांक नमुद करावे तसेच सोबत पॅन कार्ड तसेच स्थानिक प्रशासनाचे व्यवसाय प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी अन्यथा दरपत्रक/निवीदा रद्द करण्यात येईल.

आदेशान्वये

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली.

टेंडर नोटीसची प्रत बेलीफामार्फत जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर व जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात यावी.

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली.